# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### लातूर जिल्हयातील जलाशयातून पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करणेबाबत

**(१) ३४०२६ (०५-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील जलाशयासह मांजरा व तेरणा नदीवर बांधण्यात आलेल्या विविध बंधाऱ्यामध्ये पूर्ण क्षमतेने पाणी साठवून ठेवणे तसेच जलाशय पूर्ण भरल्यास अतिरिक्त होणारे पाणी नदीपात्राद्वारे न सोडता ते कालव्याद्वारे सोडण्यात यावे याबाबत पालकमंत्री यांनी जिल्हा प्रशासनाकडे पत्र व्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी यांचे समावेत चर्चाही करुनही या मागणीकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रशासनाकडून पाणी सोडण्याचे नियोजन झाले असते तर जिल्हयात पूरस्थिती, शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले नसते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय त्या अनुषंगाने जलाशयातून पाणी सोडण्याचे योग्य नियोजन न करण्यात आलेल्या संबंधितांवर कारवाई करणेसह जलाशयातील अतिरिक्त पाणी नदीपात्रात न सोडता कालव्याद्वारे सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी श्रीमती.नमीता अक्षय मुंदडा, विसस यांचे पत्र संबंधित विभागीय कार्यालयास प्राप्त आहे. तसेच मा.पालकमंत्री महोदय यांनी दूरध्वनीद्वारे विभागीय कार्यालयास याबाबत सूचना दिल्या आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

या बाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे समवेत चर्चा झालेली आहे. मागणीकडे आणि झालेल्या चर्चेकडे दुर्लक्ष झालेले नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

मांजरा धरणात येणारा येवा ७८३८८ Cusecs असल्याने, सांडव्यातुन ७०८४५.५३ Cusecs विसर्ग सोडण्यात आलेला आहे. त्याचवेळी प्रकल्पाचे लाभक्षेत्रात अतिवृष्टी चालु होती. कालव्याची वहन क्षमता (२८६ Cusecs) अत्यल्प (०.४०%) आहे. त्यामुळे कालव्यातुन जरी पाणी सोडले असते तरी सांडवा विसर्गावर फारसा परिणाम झाला नसता कालव्यातुन पाणी सोडले असते तर शेतीचे नुकसान झाले असते. त्यामुळे नदीव्दारे पाणी सोडणे योग्य असल्याने तसा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) नियोजन करून पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात विद्युत विभागात इलेक्ट्रिशीयन (वायरमन) व तत्सम प्रकारची पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ३४९९८ (१२-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात विदयुत विभागात इलेक्ट्रिशीयन (वायरमन) व तत्सम प्रकारची सुमारे ८०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी वायरमनची भरलेली पदे बहुतांश इतर जिल्हयातून आलेली असल्याने बदलीने सुमारे ६०० पदे रिक्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ लक्षात घेता सध्याच्या रिक्त पदामुळे वीज विभागाच्या कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत असुन जून २०२० मध्ये जत शहर व आसपासच्या परिसरात २० तास वीज खडीत आली होती, तसेच १८ मे, २०२० च्या दरम्यान बेळोंडगी या महावितरण कार्यालयातंर्गत येणारी बोगी खुर्द, बोर्गीब्रुद्रक तसेच इतर आसपासच्या गावाची विद्युत जनित्र सलग ६ दिवस नादुरुस्त असल्यांने नागरिकांची प्रामुख्याने शेतक-यांची यामुळे गैरसोय झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकार महावितरणच्या कर्मचा-यांच्या निष्काळजीपुणामुळे घडली असल्याचे निदर्शनास आले असल्याने उक्त प्रकरणी शासनने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०४-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्याअंतर्गत सद्य:स्थितीमध्ये कर्मचाऱ्यांची सुमारे १०५० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी सांघिक कार्यालय व परीमंडळ कार्यालयाकडून सन २०१८ ते २०२१ या कालावधीत करण्यात आलेल्या विनंती बदल्यांमुळे अनुक्रमे सुमारे २२० व ३८ अशी एकुण २५८ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त झाली आहेत. तसेच, मंडळस्तरीय पदोन्नती आदेशामुळे सुमारे ११५ पदे रिक्त झाली आहेत व सेवानिवृत्ती मुळे ६५ पदे रिक्त झालेली आहेत. अशी एकुण सुमारे ४३८ पदे रिक्त झालेली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाज्योतीसाठी नवीन प्रशासकी इमारत नागपूर येथे बांधण्याबाबत

**(३) ३५३८२ (१२-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्गासाठी स्थापन करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थाचे ( महाज्योती ) मुख्यालय दिक्षामूमीजवळील सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालय परिसरात तात्पुरते सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील हजारो मागासवर्गीय विदयार्थ्यांना महाज्योतीचा लाभ घेता यावा यासाठी नागपूर येथेच नविन जागा सुरु करण्यात यावे अशी मागासवर्गीय विदयार्थ्यांची मागणी असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाज्योतीचे नवीन प्रशासकीय कार्यालय नागपूर येथेच सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१७-०४-२०२३) :**(१) होय, महाज्योती संस्थेचे मुख्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथील इमारत क्र. १ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत आहे.
(२) होय
(३) जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून शासकीय जमीन प्राप्त झाली असून जमीनीचा ताबा महाज्योती कडून घेण्यात आला आहे. तिथे महाज्योतीची प्रशासकीय इमारत व शैक्षणिक संकुल बांधकामाचे प्राक्कलन व आराखडा तयार करण्यात येत आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभाग कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(४) ३६९२६ (१२-०१-२०२२). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, (नाशिक) प्रकल्प घोडेगांव या संघटनेच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या बदल्या, प्रकल्प कार्यालयात पर्यायी व्यवस्था देतांना सेवाजेष्ठता विचारात करण्याबाबत तसेच अनुदानित आश्रमशाळांच्या विविध प्रलंबित मागण्यांसदर्भातील लेखी निवेदन दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रकल्प अधिकारी, घोडेगांव, आयुक्त आदिवासी विकास, अप्पर आयुक्त आदिवासी विकास तसेच मा. उपमुख्यमंत्री यांना देण्यांत आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, (नाशिक) प्रकल्प घोडेगांव या संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-०४-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना (नाशिक) प्रकल्प घोडेगाव या संघटनेच्या वतीने दि.१७.११.२०२१ अन्वये तत्कालीन उप मुख्यमंत्री यांना निवेदन दिले असून सदर निवेदनाची प्रत अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे कार्यालयास प्राप्त आहे.

आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, (नाशिक) प्रकल्प घोडेगाव या संघटनेच्या निवेदनानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास,ठाणे यांनी दोन कर्मचाऱ्यांच्या बदल्या केलेल्या आहेत.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव यांचे दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये ११ कर्मचाऱ्यांच्या पर्यायी व्यवस्थेचे आदेश होणेबाबत विनंती करण्यात आली असता अपर आयुक्त, आदिवासी विकास,ठाणे यांनी दि.१५.०२.२०२२ च्या पत्रान्वये सदर कर्मचारी बदलीस पात्र असल्यास त्यांचे परिपुर्ण प्रस्ताव शिफारशीसह सादर करण्याबाबत कळविले आहे. आदिवासी विकास विभागातील शिक्षण कक्षातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), वरिष्ठ व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून, सदर प्रारुप सेवा प्रवेश नियमांस सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त झाली आहे. शिक्षण कक्षातील इतर पदांबाबत पदोन्नतीची कार्यवाही करण्यात आली असून वरिष्ठ लिपिक/लिपिक-टंकलेखक पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळासाठीचा मंजूर निधी वितरीत करण्याबाबत

**(५) ३७६९७ (०९-०४-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गतवर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अर्थमंत्र्यानी शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळासाठी रु.५० कोटीच्या निधीची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेला निधी अद्यापही महामंडळाला प्रत्यक्षात प्राप्त झालाच नसल्यामुळे हा निधी वितरीत होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग मंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे ,
(३) असल्यास, गतवर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेला हा निधी महामंडळाला प्रत्यक्षात वितरीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३)

दि.३१.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५०.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास तात्पुरत्या स्वरुपात वितरीत करण्यात आला आहे. तसेच दि.०६.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.१५.०० कोटी वरुन रु.१००.०० कोटी इतके करण्यात आले आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघाळा (ता.अंबेजोगाई, जि.बीड) सहकारी साखर कारखाना लि.ची जमिन विक्रीस परवानगी दिल्याबाबत**

**(६) ३८१२१ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघाळा (ता. अंबेजोगाई, जि. बीड) सहकारी साखर कारखाना लि. येथे गैरव्यवहार तसेच आर्थिक नुकसान झाल्याने संचालक मंडळ बरखास्त करणे व चुकीच्या पध्दतीने कारखान्याची जमिन विक्रीस परवानगी दिल्या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.७ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास सहकार मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) होय. चौकशी करण्यात आली आहे.
लोकप्रतिनिधीच्या निवेदनातील मुदयांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांनी केलेल्या चौकशीत, कारखान्याने अधिकारानुसार शासकीय मूल्यांकनापेक्षा जास्त दराने जमिनीची विक्री करुन प्राप्त रक्कम एफ.आर.पी.पोटी ऊस पुरवठादारांना दिलेली आहे.

उत्पादीत साखर शासनाने ठरवून दिलेल्या दराने विक्री केली व खराब साखर संचालक मंडळाच्या मान्यतेने विक्री केली आहे. उत्पादीत स्पेशली डिर्नेचर स्पिरीट (एस.डी.एस.) विक्रीसाठी टेंडर मागविण्यात आले होते. त्यामध्ये जास्त दर नमूद केलेल्या व्यापाऱ्यास विक्री केली. सदर विक्रीतून जमा झालेली रक्कम स्पिरीट विक्री उत्पन्न खाती नोंदविलेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ (अ) अन्वये कारखान्याच्या संचालक मंडळास प्रशासक नियुक्तीबाबत कारणे दाखवा नोटीस दिली आहे. सदर नोटीशीच्या अनुषंगाने प्राप्त खुलाश्यास अनुसरुन गुणांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर) औरंगाबाद यांनी नोटीस रद्दबातल केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर विभागातील साखर कारखान्याकडून तब्बल ३४० कोटी एफआरपीचे थकीत असल्याबाबत**

**(७) ४१७४३ (०९-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१). यंदाच्या गळीत हंगामात कोल्हापूर विभागातील साखर कारखान्याकडून तब्बल ३४० कोटी एफआरपीचे थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील कोण कोणते साखर कारखाने आहेत,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. अतुल सावे (२४-०३-२०२३) :**(१) कोल्हापूर विभागातील कोल्हापूर व सांगली जिल्हयातील एकूण ४१ कारखान्यापैकी गाळप हंगाम सन २०२१-२२ मध्ये ३६ साखर कारखान्यांनी दि.१५/०१/२०२२ अखेर एकूण १,४४,१९,३३६ मे.टन ऊसाचे गाळप केले आहे.

सदर गाळप ऊसाची नक्त एफआरपीनुसार देय रक्कम ४१९.५३ कोटी होती.

त्यापैकी दि. ३१/०१/२०२२ अखेर रु. ३६७.९७ कोटी इतकी देय बाकी शिल्लक होती. तर दि.१५ जुन २०२२ अखेर रू.२३४.७९ कोटी एवढी एफआरपी देणे बाकी आहे.

(२) १. आजरा ससाका लि, गवसे

२. भोगावती ससाका लि, परिते

३. छ. राजाराम ससाका लि,क.बावडा

४. ओलम ॲग्रो लि, राजगोळी

५. कुंभी-कासारी ससाका लि, कुडीत्रे

६. वारणा ससाका लि, वारणानगर

७. डॉ.डी.वाय. पाटील ससाका लि, गगनबावडा

८. इको केन शुगर्स लि, म्हाळुंगे

९. रिलायबल शुगर्स लि, फराळे

१०.आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज ससाका लि,हरळी

(३) ८० टक्केपेक्षा कमी एफआरपी रक्कम अदा केलेल्या कारखान्यांची सुनावणी

प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर/ साखर आयुक्तालय स्तरावर घेणेत येत असून सदरचे कारखाने एफआरपीची जास्तीत जास्त रक्कम ऊस उत्पादक शेतक-यांना अदा करतील या दृष्टीने दक्षता घेणेत आलेली आहे.

---

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८) ४३३९४ (०९-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयातील व्यवस्थापक (प्रशासन), उपव्यवस्थापक, लेखापाल, कनिष्ठ सहाय्यक, लिपिक-टंकलेखक, गोदामपाल इत्यादी एकुण २२० मंजुर पदांपैकी तब्बल १५० पदे रिक्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०८-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गृह विभागाकडील दिनांक ०६.०३.२०१८ चे शासन निर्णयान्वये पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सरळसेवा पदभरती २०१४ च्या अनुषंगाने उमेदवारांचे मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दावे प्रलंबित असल्याने पदभरती बाबतची पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) गावांमध्ये १३२ के व्ही चा वीज प्रकल्प मंजूर असून निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ४३९५६ (०९-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) गावांमध्ये १३२ के व्ही चा वीज प्रकल्प मंजूर असून निधी अभावी प्रलंबित असल्याची बाब माहे फेब्रुवारी , २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प मंजूर असूनही पूर्ण न झाल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या ३३ के व्ही च्या प्रकल्पामधून मागणी प्रमाणे वीज पुरवठा होत नसल्याने शेतकरी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरी येथील मंजूर असलेला १३२ के व्ही चा वीज प्रकल्पास तात्काळ निधी देऊन पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) सद्यस्थितीत परभणी जिल्हयातील जिंतूर, सेलू, परभणी तालुक्यांना तसेच हिंगोली जिल्हयातील सेनगांव तालुक्यातील वीज ग्राहकांना १३२ के.व्ही. जिंतूर (११० एमव्हीए क्षमता ) आणि परभणी ( १२० एमव्हीए क्षमता ) या दोन उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जातो. सदर दोन्ही उपकेंद्रांची एकूण स्थापित क्षमता ही २३० एमव्हीए असून उच्चतम मागणी १८५ एमव्हीए एवढी आहे . त्यामुळे वीज ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात तांत्रिक अडचण निर्माण होत नाही. तथापि, सदर उपकेंद्रातून निर्गमित होणाऱ्या ३३ के.व्ही. वाहिनीची लांबी जास्त असल्याने रब्बी हंगामात उच्चतम मागणीच्या वेळी काही वेळा ३३ के.व्ही. अतिभारीत फिडरवरुन कमी दाबाने वीज पुरवठा होतो. अशा फिडरवरील उपकेंद्रातील ११ के.व्ही. कृषी वाहिन्यांचा वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने दोन-तीन भागामध्ये विभागुन टप्प्याटप्याने ८ ते १० तास सुरळीत ठेवला जातो.

(३) भविष्यात परभणी जिल्हयातील जिंतूर, सेलू व परभणी तालुक्यातील कृषी, घरगुती, औद्योगिक, वाणिज्य सर्व संवर्गातील ग्राहकांना गुणवत्तापुर्वक अखंडित वीज पुरवठा करणे शक्य व्हावे व विद्युत वितरण प्रणाली सक्षम करण्याच्या दृष्टीने मौजे बोरी, ता. जिंतूर येथे नवीन १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारणीच्या प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी व मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आर्थिक व्यवहार्यता तपासुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या नोकर भरती परीक्षेत गुण वाढविण्यासाठी पैशांची मागणी केल्याबाबत**

**(१०) ४७५३२ (३१-१०-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या नोकर भरती परीक्षेत गुण वाढविण्यासाठी एका तरुणाला भ्रमणध्वनीवर कॉल करुन ८० हजारांची मागणी केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन आरोपींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०२३) :** (१),(२) व (३) हे खरे नाही.
भंडारा जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या नोकर भरती परीक्षेत गुण वाढविण्यासाठी ८० हजारांची मागणी केल्याबाबत माहे एप्रिल २०२२ मध्ये स्थानिक पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भेंडाळा (ता. चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील राजीव उपसा सिंचन योजनेला प्रशासकीय मंजूरी व निधि उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) ४८४४७ (१०-११-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात वनाचे प्रमाण अधिक असल्याने जलसिंचनाच्या सोयी नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाब लक्षात घेवून भेंडाळा (ता. चामोर्शी) गावाजवळ वैनगंगा नदीवर राजीव ऊपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेस प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू सिंचन योजना कार्यान्वित झाल्यास या क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होवून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येण्यास मदत मिळेल हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त योजनेसह गडचिरोली जिल्हयातील इतर जलसिंचन योजनांना प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
गडचिरोली जिल्ह्यात जलसिंचनाच्या सोयी हाती घेण्यात आलेल्या आहेत, तथापी वनसंवर्धन कायदा-१९८० अन्वये वनजमीनीच्या अडचणीमुळे व मंजुरी अभावी सदर जलसिंचन प्रकल्प हाती घेण्यास अडचण निर्माण झाली आहे.
(२) होय,
सदर योजना अन्वेषणाधिन आहे.
(३) सदर योजना अन्वेषणाधिन आहे, सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेण्यास्तव सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता उपसा सिंचन योजनेची परिगणके व संकल्पन, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडुन प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) होय.
सदर योजनेमुळे चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरातील १३ गावातील ५२५० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ प्रस्तावित आहे.
(५) राजीव उपसा सिंचन योजनेमुळे चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरातील १३ गावातील ५२५० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ प्रस्तावित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील राजीव उपसा सिंचन योजना व्यतिरिक्त इतर योजेनेबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ)  बांधकाम पुर्ण झालेले प्रकल्प:-
१) चिचडोह बॅरेज:- सदर योजनेची साठवण क्षमता ६२.५३ दलघमी असून बॅरेजचे बांधकाम जून, २०१८ रोजी पूर्ण झालेले आहे. या योजनेच्या पाणीसाठयातून खालील योजना प्रस्तावित आहेत:-
अ.   क्र. योजनेचे नाव जिल्हा शेतीयोग्य क्षेत्र हे. सद्य:स्थिती
१ तळोधी मोकासा
उसिंयो गडचिरोली ४३३० प्रशासकीय
मान्यता प्राप्त
२ राजीव उसिंयो गडचिरोली ५१०० प्रशासकीय
मान्यता प्रक्रियेत
३ चिचडोह बॅरेजचे स्वतंत्र लाभक्षेत्र गडचिरोली १६०० बांधकाम
पूर्ण
एकूण गडचिरोली११०३०
४ वाघोली बुटी उसिंयो चंद्रपूर ४२३३ बांधकाम
पूर्ण
ब) बांधकामाधीन प्रकल्प:- एकूण १५ बांधकामाधीन प्रकल्प आहेत.सदर प्रकल्पास सन २०२२-२३ या वर्षासाठी रू.१०९.९५०५ कोटी मंजूर निधी आहे. तसेच सदर प्रकल्पांची अद्यावत किमंत रू.१४८८.६९२ कोटी आहे. तसेच गडचिरोली जिल्हयातील ८ प्रकल्प वनबाधीत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सारूळ (ता. केज, जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही केंद्राच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत

**(१२) ४९१७१ (१६-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारूळ (ता. केज, जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही केंद्राचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महावितरण. मुंबई. यांनी मंजुरी साठी दिनांक २४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकरी संचालक, महापारेषण, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू केंद्र उभारण्याच्या कामाचे भूमीपूजन होऊन बरीच वर्ष झाली असून आवश्यक जागाही महापारेषणच्या ताब्यात आहे. त्यामुळे सारूळ (ता. केज, जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही केंद्राच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी देऊन काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सारूळ (ता. केज, जि. बीड) येथे १३२/३३ केव्ही केंद्रास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०२३) :** (१)  हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव (ऊर्जा) यांना दिलेले दि. २५ जुन, २०२२ चे निवेदन महापारेषण कंपनीस प्राप्त झाले आहे.
(३) सारुळ (ता. केज, जि. बीड) येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याच्या प्रस्तावावर दि.०४.०८.२०२२ रोजी झालेल्या महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळ बैठकीत चर्चा संपन्न झाली असुन सदरील विषय निर्णयाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ राज्यात स्थापन करण्यासाठी न्यायमुर्तीची समिती गठीत केल्याबाबत**

**(१३) ४९५५० (१६-०८-२०२२). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ राज्यात कुठे स्थापन करावे याची निश्चिती करण्यासाठी २ न्यायमुर्तींची समिती गठीत करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन व्हावे, यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर या सहा जिल्ह्यातील बार असोसिएशन, पक्षकार आणि नागरिक गेल्या ३५ वर्षापासून लढा देत असून खंडपीठ कृती समितीने गेल्या वर्षभरात राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा व पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०२३) :** (१) मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणेबाबत जिल्हयांतून प्राप्त होणाऱ्या निवेदनांवर कार्यवाही करण्याकरिता मा. मुंबई उच्च न्यायालयाने दोन न्यायमुर्तींची (मा. ज्येष्ठ प्रशासकीय न्यायमुर्ती व मा. कनिष्ठ प्रशासकीय न्यायमुर्ती) समिती स्थापन केली आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून प्रलंबीत खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, अशी शिफारस करण्याबाबतचा निर्णय दि. १२/०५/२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तशी शिफारस मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि. १७/०७/२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंती दि. २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता बैठक आयोजित करण्याबाबत शासन पत्र, दि. १९/०१/२०१९ अन्वये मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली आहे तर शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि. १९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. शासन पत्र, दि. ०८/३/२०२२ अन्वये नियमित खंडपीठ स्थापन होईपर्यंत शक्य तितक्या लवकर कोल्हापूर येथे सर्किट बेंच स्थापन करण्याची विनंती मा. मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली होती. मा. मुख्य न्यायमुर्ती यांची दि. १०/०३/२०२२ रोजी कोल्हापूर खंडपीठ समिती तसेच विभागातील अन्य बार असोसिएशनच्या सदस्यांसोबत बैठक पार पडली. सदर बैठकीत फिरते खंडपीठ स्थापन करण्याची प्रक्रिया, विधिविषयक बाबी तसेच आवश्यक पायाभूत सुविधा विचारात घेऊन, फिरते खंडपीठ स्थापनेबाबत निर्णय होण्याकरिता काही वेळ आवश्यक असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणण्यात आल्याचे, मा. मुख्य न्यायमुर्ती यांनी दि. १५/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहा जिल्हयांमध्ये प्रत्येकी १०० मेगावॅट असे तब्बल ६०० मेगावॅटचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(१४) ४९६१६ (१६-०८-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा जिल्हयांमध्ये प्रत्येकी १०० मेगावॅट असे तब्बल ६०० मेगावॅटचे सौर प्रकल्प उभारण्याचा निर्णय महानिर्मितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या जिल्हयात मेगावॅटचा ग्रीड कनेक्टेड सौर प्रकल्प उभारण्यात येणार असून त्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, असल्यास त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात होणार असून त्याची रुपरेषा काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) महानिर्मिती कंपनीद्वारे “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना” अंतर्गत सहा महसुली विभागात (नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण, नाशिक आणि पुणे) प्रत्येकी १०० मेगावॅट असे एकूण ६०० मेगावॅट संचयी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी स्वारस्य निविदा प्रकाशित करण्यात आली आहे.

सदर स्वारस्य निविदेची प्रक्रिया सुरु आहे.

---

**पाटोदा,( ता.येवला, जि.नाशिक) येथे १३२/३३ केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र निर्माण करण्याबाबत**

**(१५) ४९९१९ (२०-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला तालुक्यातील विजेचे प्रश्न सोडविण्यासाठी पाटोदा, (ता.येवला, जि.नाशिक) येथे १३२/३३ केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र निर्माण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींची दिनांक १२ सप्टेंबर २०२२, दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यानुसार शासनाकडे केलेली आहे,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त प्रश्नाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

दि १२.०९.२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) महावितरण कंपनीकडून पाटोदा (ता. येवला, जि. नाशिक) येथे नवीन १३२/३३ के.व्ही. वीज उपकेंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमास अद्याप प्राप्त झालेला नाही. महावितरण कंपनीकडून पाटोदा, (ता. येवला, जि. नाशिक) उपकेंद्राबाबतचा प्रस्ताव महापारेषण कंपनीस प्राप्त झाल्यास प्रणाली अभ्यासाव्दारे सुसाध्यता तपासून नियमानुसार योग्य तो निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**तुळापुरमध्ये छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारण्याबाबत**

**(१६) ५०६५३ (२३-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राची अस्मिता, स्फूर्तिस्थान स्वराज्यरक्षक श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसे जगातिक दर्जाचे स्मारक वढु बु. व तुळापूर (ता. हवेली, जि.पुणे) येथे उभारण्याबाबतची घोषणा तत्कालिन उपमुख्यमंत्री यांनी करुन या आराखडयास २६९.२४ कोटी रुपये रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामास स्थगिती देण्यात आल्याचे माहे ऑगस्ट २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मारकाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे तसेच या कामांवर खर्च करण्यात आलेल्या निधीचा तपशिल काय आहे,
(४) असल्यास, प्रत्यक्षात काम सुरु होऊन संपूर्ण काम होण्यास सुमारे किती कालावधी लागेल तसेच स्मारकाचे काम लवकर पूर्ण करण्याच्यादिृष्टने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३), (४) व (५) सदर आराखड्याबाबतचे सादरीकरण दि.१४.०२.२०२३ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आले असून, याबाबतची पुढील कार्यवाही नियोजन विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

### बल्लारपूर पोलीस स्टेशनमध्ये एका राजकीय पक्षाच्या नेत्याचा वाढदिवस साजरा केल्याबाबत

**(१७) ५०६८६ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर पोलीस स्टेशनमध्ये एका राजकीय पक्षाच्या नेत्याचा वाढदिवस ठाणेदाराच्या कक्षामध्ये साजरा करण्यात आले असल्याची धक्कादायक बाब दिंनाक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) उप विभागीय पोलीस अधिकारी, राजुरा यांनी केलेल्या चौकशीअंती सादर केलेल्या कसुरी अहवालावरुन बल्लारपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. उमेश पाटील यांनी केलेल्या गैरवर्तनाबद्दल त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम, १९५६ मधील तरतूदीनुसार " सक्त ताकीद " ही शिक्षा दि. १२/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र संस्था स्थापना करण्याबाबत

**(१८) ५०६९५ (२४-०१-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचा शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्वतंत्र संस्थेची रचना व सदर संस्थेकडे कोणकोणत्या बाबी सोपविण्यात येणार आहेत याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, सदर निर्णय किती कालावधात घेणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र (Maharashtra Institution for Transformation-MITRA )" ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

---

## राज्यातील आदिवासी जनता मूलभूत हक्कांपासून वंचित असल्याबाबत

**(१९) ५०७३९ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकीपठार, डोळखांब, सोगाव, अघई, साकडवाब, कसारा (जि.ठाणे, ता.शहापूर) या दुर्गम आदिवासी गावपाडयावर स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही मुलभूत सेवासुविधा व साधा कच्चा रस्ता पोहोचला नसल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर तालुक्यात ६० आदिवासी गावपाडयांतील रस्ते मुख्य रस्त्यांना जोडावेत या प्रमुख मागणीकरीत दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या दरम्यान शहापूर पंचायत समितीवर आदिवासी बांधवांनी मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावपाडयांवर रस्ता करण्यासाठी जमीन खासगी वा वनजमीन भूसंपादन करण्यासाठी ३/२ चा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने मुलभूत सेवासुविधा व चांगले रस्ते बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२३-०३-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर गावपाड्यांना जोडणारे रस्ते हे वनजमीन आणि खाजगी जमीनीच्या हद्दीतून जात असल्याने संबंधित ग्रामपंचायतीमार्फत जमीन अधिग्रहणासाठीचे प्रस्ताव संबंधित यंत्रणेकडे सादर करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय आश्रमशाळा तसेच अनुदानीत आश्रमशाळांमधील रिक्त असलेली प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(२०) ५०८४३ (१८-०१-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय आश्रमशाळा तसेच अनुदानीत आश्रमशाळांमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांची संख्या मोठी असल्याने काही ठिकाणी एकाच शिक्षकाकडे अनेक वर्गाचा पदभार देण्यात आलेला आहे असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , शिक्षकांची एकुण किती पदे रिक्त आहेत, तसेच या रिक्त पदांवर प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या नेमणुका होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२३-०३-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर रिक्त पदांवर रोजंदारी / तासिका पद्धतीने उमेदवारांची नियूक्ती करण्यात आलेली आहे.
(३) आश्रमशाळेत खालील प्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची रिक्त पदे आहेत.

| शासकीय आश्रमशाळा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | मंजुर | भरलेली | रिक्त |
| १. | प्रा.शिक्षक | ३१०९ | १८१० | १२९९ |
| २. | मा.शिक्षक | १९११ | ११५३ | ७५८ |

| अनुदानित आश्रमशाळा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | मंजुर | भरलेली | रिक्त |
| १. | प्रा.शिक्षक | ३४१२ | ३०९७ | ३१५ |
| २. | मा.शिक्षक | २०५६ | १८५८ | १९८ |

सुधारीत आकृतीबंधाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग तसेच इतर सर्व संवर्गाची भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही विभागामार्फत चालू आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**गडचिरोली तालुक्यातील गोगाव उपसा सिंचन योजनेच्या पाईपलाईन (पि.डी.एन.) द्वारा पाणीपुरवठा करण्याच्या वाढीव अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**

**(२१) ५११८४ (१८-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर गडचिरोली तालुक्यात गोगाव गावाजवळ गोगाव उपसा सिंचन योजना कार्यान्वित आहे, हे खरे आहे काय,
(२) परंतु याचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना होत नसल्याने या योजनेतून पाईपलाईन (पि.डी.एन.) द्वारा पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेच्या पाईपलाईन (पि.डी.एन.) द्वारा पाणीपुरवठा करण्याच्या वाढीव अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकिय मान्यता देवून निधी उपलब्ध करून दिल्यास त्याचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळेल हे खरे आहे काय?
(४) असल्यास, शासन या योजनेच्या पाईपलाईन (पि.डी.एन.) द्वारा पाणीपुरवठा करण्याच्या वाढीव अंदाजपत्रकास मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) सदर योजनेचे शेतीयोग्य क्षेत्र (CCA) ४०८ हे.व सिंचन योग्य क्षेत्र (ICA) ३७० हे. आहे. सदर योजनेद्वारे गोगाव व अडपल्ली या दोन गावांना सिंचनाचा लाभ मिळत आहे. सदर योजनेच्या लाभक्षेत्रातील ८५.७० हे. जमीन गोंडवाना

विदयापीठाच्या बांधकामाकरीता अधिग्रहण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईन लाभक्षेत्रातून छेदून जात असल्याने ५.११ हे. क्षेत्र कमी होत आहे. गोंडवाना विदयापीठ व नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईनचे बांधकाम झाल्यानंतर योजनेचे लाभक्षेत्र ९०.८१ हे. ने कमी होणार आहे. या संपादनानंतर योजनेचे लाभक्षेत्र ( CCA) ३१७.१९ हेक्टर एवढे राहणार आहे. या लाभक्षेत्राकरीता बंद नलिका वितरण प्रणाली बांधकामाकरीता एकंदर लाभक्षेत्राचे पुनश्च: सर्व्हेक्षण व बंद नलिका वितरण प्रणाली संकल्पनाचे काम करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष उपलब्ध लाभक्षेत्र हे गोंडवाना विदयापीठ व रेल्वेचे भूमीसंपादनानंतरच स्पष्ट होणार आहे. तरी यांनतरच बंद नलिका वितरण प्रणालीचे सर्व्हेक्षण व संकल्पन आवश्यकतेनुसार प्रस्तावित करता येईल.
(५) लागू नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील ३३/११ के.व्ही.चे नवीन उपकेंद्र उभारण्याबाबत

**(२२) ५१२९४ (१७-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी सोबत मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी यांच्यासोबत झालेल्या आढावा बैठकीत अमरावती जिल्ह्यात ३३/११ के.व्ही.चे नवीन उपकेंद्रे प्रस्तावित केली आहेत, हे खरे आहे काय ,
(२)असल्यास, किती उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आली असून त्या उपकेंद्राची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यात ३३/११ के.व्ही.चे नवीन उपकेंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अमरावती जिल्हयात ३३/११ के.व्ही. चे एकूण २७ नवीन उपकेंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यापैकी आदिवासी उपयोजना (TSP) योजनेअंतर्गत प्रस्तावित एका नवीन उपकेंद्राचे कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आले आहेत. तसेच दोन नवीन उपकेंद्रांचा समावेश कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० योजनेअंतर्गत केलेला असून त्यापैकी एका उपकेंद्रांच्या कामाचे कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आले आहेत व उर्वरित उपकेंद्राच्या जागेचा ताबा मिळताच कंत्राटदारस कार्यादेश देण्यात येईल. तसेच २४ नवीन उपकेंद्रांचा समावेश सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत करण्यात आलेला असून सदर योजनेअंतर्गत उपकेंद्र उभारणीच्या कामास मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी व जागेच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा गांधी तंटामुक्त समित्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(२३) ५१३४९ (२४-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गावातील छोटे-मोठे तंटे पोलीस ठाण्यात जाण्याअगोदरच मिटावीत. तसेच गावपातळीवर एकोपा निर्माण होऊन जातीय सलोखा कायम ठेवणे या उद्देशाने ग्रामपातळीवर तंटामुक्त समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामुळे गावातील सर्व जाती,धर्मातील लोक एकत्र यायचे सर्वांचे सण उत्सव एकत्र साजरे करायचे, सार्वजनिक कामांना अधिक प्राधान्य दिले जायचे, ग्रामस्थ, पोलीस अधिकारी उत्साहाने यामध्ये सहभागी व्हायचे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तंटामुक्त समितीच्या माध्यमातून तंटे सोडविण्याबरोबरच गावात संपूर्ण दारुबंदी करणे,अनिष्ट चालीरीती परंपरांना प्रतिबंध करणे, विविध उत्सवात समाजोपयोगी उपक्रम राबवणे,वनसंवर्धन करणे,संरक्षण करणे, ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करुन गाव तंटामुक्त करणे, गावातील तंटे सामंजस्याने मिटविणे, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आदी धार्मिक कार्यक्रम पोलिस संरक्षणाविना साजरे करणे आदी कामे तंटामुक्त समितीमार्फत राबवली जात होती.परंतू शासनाने पूर्णपणे तंटामुक्त समित्याकडे दुर्लक्ष केले असल्याचे माहे, मार्च, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास,महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान पुर्वीप्रमाणे प्रभावीपणे राबबून उत्कृष्ट काम करून तंटामुक्त समित्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत नमूद कामे महात्मा गांधी तंटामुक्त गाव समित्यांमार्फत राबविली जात आहेत.
(४) व (५) सदर योजनेअतंर्गत राज्यातील २७५५६ ग्रामपंचायतींपैकी तंटामुक्त झालेल्या १८९८९ ग्रामपंचायतींना ‘तंटामुक्त गाव पुरस्कार’ देण्यात आले आहेत. योजनेच्या उद्दिष्टपूर्तीचे प्रमाण सुमारे ६९% आहे.

---

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील ४० नविन प्रकल्पांकरीता पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याबाबत

**(२४) ५१४८५ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्य गोदावरी खोऱ्यातील मंजूर १९.२९ अघफू अतिरिक्त पाणी साठ्यातून पाण्याची उपलब्धता लक्षात घेवून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील ४० नविन प्रकल्पांना मंजूरी प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांकरीता पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्या संबंधीचे प्रस्ताव मुख्य अभियंता, जनविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचेकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पाणी उपलब्धता प्रमाणपत्राअभावी प्रकल्पाचे काम सुरु होणे शक्य नसल्याने प्रमाणपत्र मिळवण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१) होय खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मध्य गोदावरी खो-यातील मंजूर १९.२९ अघफू अतिरीक्त पाण्यातून मंजूर नांदेड जिल्ह्यातील ४० नवीन प्रकल्पांपैकी राज्यस्तरीय १४ प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रस्ताव मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरणसुरक्षितता, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ६ योजनांना मुख्य अभियंता, नियोजन व धरण सुरक्षितता, नाशिक यांचेकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले असून उर्वरित ८ योजनांचे पाणी उपलब्धता प्रस्तावावर मुख्य अभियंता, नियोजन व धरण सुरक्षितता, नाशिक यांचेकडून मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. सदर मुद्यांचे अनुपालनाबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

तसेच वरील ४० प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प स्थानिक स्तरीय असून त्यापैकी २३ योजनांचे प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाकडून या कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदर प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसाठी परत करण्यात आलेले आहेत. उर्वरीत ०३ स्थानिक स्तरीय योजनांचे पाणी उपलब्धता प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाकडून या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेले नाहीत.
(३) प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्तावाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही प्रगत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड ( जि.रायगड ) तालुक्यामध्ये न्यायालय उभारण्याचा प्रस्तावाबाबत**

**(२५) ५१७१७ (१७-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड ( जि.रायगड ) तालुक्यामध्ये न्यायालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, यावर कधीपर्यत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०२३) :** (१) होय, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून महाड, जिल्हा रायगड येथे दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर हे न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) होय, प्रस्तावित दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर , महाड या न्यायालयासाठी महाड येथील सध्याच्या न्यायालयीन इमारतीत न्यायदान कक्ष उपलब्ध आहे.
(३) प्रस्तावित दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर , महाड हे न्यायालय स्थापनेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली शहरात (जि.ठाणे)महावितरणची जनित्रे उघडी असल्याबाबत**

**(२६) ५१७७९ (१७-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली शहरात (जि.ठाणे) महावितरणाची जनित्रे (ट्रान्सफार्मर) रस्त्याच्या मधोमध असून काही ठिकाणी अद्यापी ओव्हरहेड विद्युतवाहिन्या लोंबकळतच आहेत तसेच ट्रान्सफार्मर उघडे असल्याने धोकादायक झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंबिवलीतील प्रमुख रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांमध्ये झालेल्या डी.पी. पोल, ट्रान्सफार्मर केबलची मेंटेनेंसची कामे करत नसल्याने शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, अशा परिस्थितीमुळे निवासी भागात तसेच इतर अनेक ठिकाणी अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी जुनी डोंबिवली येथे ट्रान्सफार्मर असलेल्या जागेत एका फेरीवाल्याचा जीव गेला असून आजदेपाडा, भोपर, नंदिवली, कोपरगाव, जुनी डोंबिवली, गरिबाचा वाडा आदि असंख्य भागातील रहिवाश्याची महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयाकडे मागील २ वर्षापासून सातत्याने लेखी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) हे अंशत:खरे आहे.
डोंबिवली विभागात ८० टक्के भूमिगत वाहिन्या व २० टक्के उपरी वाहिन्या अस्तित्वात आहेत. तसेच रस्ता रुंदीकरण झाल्याने काही रोहित्रे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यामध्ये आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
डोंबिवली विभागात वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करण्यात येते. महावितरणच्या पोल, वाहिनी वा ट्रान्सफॉर्मरमुळे वाहतुक कोंडी झाल्याचे वा त्यामुळे अपघात घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) हे खरे नाही.
परंतु जुनी डोंबिवली येथे फेरीवाल्याला झालेला अपघात हा महावितरणच्या ट्रान्सफॉर्मरमुळे झालेला असल्याचा निष्कर्ष काढता येत नाही असा अहवाल विद्युत निरीक्षक, ठाणे यांनी दिलेला असून शवविच्छेदन अहवालातील सदर मृत्यू विद्युत धक्क्याने झाल्याची नोंद नाही. महावितरणच्या स्थानिक कार्यालयाकडे यासंदर्भात रहिवाश्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यावर महावितरणमार्फत तातडीने कार्यवाही करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय-निमशासकीय कार्यालयांतील कार्यरत लिपिक कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(२७) ५१९६३ (१३-०२-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय-निमशासकीय कार्यालयांतील कार्यरत लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्वासित प्रगती योजनेंतर्गतची पदोन्नती, विशिष्ट संवर्गाला लागू असलेली पदोन्नतीसाठीची विभागांतर्गतची परीक्षा, बदल्या कार्यरत असताना व निवृत्तीनंतर देय असलेले लाभ, प्रशिक्षणे इत्यादीबाबत अनेक उणीवा आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने या कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत चर्चा करुन या लिपीकवर्गीयांचे प्रलंबित मागण्या निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२३) :** (१), (२), (३) लिपिकवर्गीय कर्मच्याऱ्यांचे मागणी संदर्भात निवेदने प्राप्त झाली आहे व त्यावर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद शिक्षकेतर कर्मचारी यांना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३ लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे. तथापि सदर ३ लाभाची योजना सद्यस्थितीत इतर निमशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली नाही.

वित्त विभाग, शासन निर्णय दि.१४.०३.२०२३ अन्वये, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

राज्यशासकीय, निमशासकीय लिपीकसंवर्गीय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दि.२३.०५.२०२२ अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०९.२०११ च्या राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत सर्व लिपिक संवर्गास नियमित प्रशिक्षण देण्याची योजना तयार करण्यात आली आहे. बदल्यांबाबतच्या मागणीचा समावेश लिपिकसंवर्गीय कर्मचाऱ्यांच्या निवेदनात नव्हता.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**आदिवासी समाजबांधवांच्या मूलभूत न्यायहक्कांसाठी विविध संघटनांनी डहाणू तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन केल्याबाबत**

**(२८) ५२२७९ (१८-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि. पालघर) येथील आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्या आणि न्याय हक्कांबाबत विविध संघटनांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने डहाणू तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या काय होत्या, तसेच उक्त मागण्यांपैकी किती मागण्या शासनाकडून प्रत्यक्षात पूर्ण करण्यात आल्या व किती मागण्या अद्याप प्रलंबित आहेत,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२८-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

दि.०९ ऑगस्ट २०२२ रोजी जागतिक आदिवासी दिनी तहसिलदार कार्यालय डहाणू येथे आदिवासी बांधवांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

(२) व (३) तहसिलदार कार्यालय डहाणू येथे आंदोलकांचे शिष्टमंडळ व विविध शासकीय विभागांचे अधिकारी यांच्या दरम्यान एकूण २४ मुद्यांवर चर्चा झाली. आदिवासी बांधवांच्या मागण्यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याबाबत संबधित विभागांना सूचित करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील “सहाय्यक जिल्हाधिकारी” तथा “ प्रांत अधिकारी “ या दोन्ही पदांना स्वतंत्र पदभार देऊन रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२९) ५२३६४ (१३-०२-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) पालघर जिल्ह्यातील “सहाय्यक जिल्हाधिकारी” तथा “प्रांत अधिकारी” यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणूचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने आदिवासी विकास योजना राबविताना अनेक अडचणी येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणा-या सर्व योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने डहाणू विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनात प्रकल्प अधिकारी व प्रांत अधिकारी या दोन्ही पदांना स्वतंत्र पदभार देऊन दोन अधिकारी नेमण्याची मागणी करूनही शासनाने अद्याप याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्याची विलंबाची कारणे काय ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०२-२०२३) :** (१) हे, खरे नाही, तथापि, अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) आदिवासी विकास विभागाचा सुधारीत आकृतीबंध दि.१६.११.२०२२ रोजी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार वित्त विभागाच्या दि.३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सरळसेवेच्या कोटयातील गट-क मधील रिक्त पदे (लिपीक संवर्गीय पदे वगळुन) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०४.०५.२०२२ व दि.२१.११.२०२२ मधील तरतूदीनुसार भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(३) व (४) लोकप्रतिनीधींकडून प्राप्त मागण्यांच्या अनुषंगाने, आदिवासी विकास विभागातील ११ अतिसंवेदनशील प्रकल्प कार्यालयांकरीता पूर्णवेळ व अनुभवी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास विनंती करण्यात आली होती. तथापि, सदर विनंती मान्य करता येणार नाही असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही,

---

## शिर्डी येथील साईबाबा समाधी मंदिराच्या छतावर वायुवीजन असलेल्या यंत्रणेबाबत

**(३०) ५२५१२ (१९-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील साईबाबा समाधी मंदिराच्या छतावर वायुवीजन यंत्रणेचा बोजा ठेवल्यामुळे या ऐतीहासिक वास्तूलाच धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साई मंदिरात हवा खेळती राहावी यासाठी छतावर ठेवलेल्या वायुवीजन यंत्रणा सुरू करताना ऐतीहासिक वास्तुला मोठ्या प्रमाणात धक्के बसत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समाधी मंदिरावरील वायुवीजन यंत्रणा इतरत्र ठेऊन जुन्या ऐतीहासिक वास्तूला कोणताही धक्का लागणार नाही याबाबत शासनाने कोणता आढावा घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०२३) :**(१) हे खरे नाही.
तथापि, श्री साईभक्तांना श्रींचे दर्शन घेतेवेळी उष्णतेचा त्रास होवू नये, साईसमाधी मंदिरातील हवा खेळती राहावी याकरीता सन २०१५ मध्ये समाधी मंदिर वास्तुस हानी होणार नाही अशा पध्दतीने बसविण्यात आलेली सेंट्रल एसी यंत्रणा माहे सप्टेंबर २०२२ मध्ये शिर्डी संस्थानने काढलेली आहे. सदर यंत्रणेमुळे मंदिराचे वास्तुस कोणतीही हानी झालेली नाही अथवा धोका निर्माण झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत

**(३१) ५२५४३ (१९-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीमार्फत जवळपास तीस ते पस्तीस हजार कंत्राटी कामगार म्हणून १५ ते २० वर्षापासून कार्यरत असून या तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगार हे नियमित कामगारांप्रमाणे काम करीत आहेत तसेच या कामगारांनी कोविड काळादेखील या कामगारांचे मोठे योगदान होते ही सेवा बजावत असताना ६५ कंत्राटी कामगार मृत्यूमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटी कामगारांनी शासन अंगीकृत या वीज कंपन्यांच्या नोकर भरतीमध्ये सहभागी होता यावे म्हणून त्यांच्या वाढीव वयोमर्यादेत शिथिलता आणावी यासाठी मा.ऊर्जा मंत्री यांची माहे एप्रिल, २०२२ मध्ये मंत्रालयात भेट घेऊन तशी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामगारांचे मागणीनुसार या कंत्राटी तत्वावरील कामगारांना नियमित रोजगार मिळावा यासाठी वयोमर्यादेत सवलत व सरळसेवा भरतीमध्ये पात्रता यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी तिन्ही वीज कंपन्यांच्या मानव संसाधन विभागांच्या संचालकांची समिती स्थापन करण्याचे मा.ऊर्जा मंत्री यांनी आदेशित केल्याचे दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर समिती स्थापन करण्यांत आली आहे काय, असल्यास, केव्हा, तसेच सदर समितीच्या शिफारशीनुसार सकारात्मक निर्णय घेण्यांत येईल असेही मा.मंत्री महोदयांनी त्यावेळी घोषित केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास सादर करण्यांत आला आहे काय, समितीच्या अहवालाच्या शिफारशी काय आहेत, त्यानुसार कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०२३) :** (१) महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीमध्ये अनुक्रमे १६६५०,३९५५ व २१५२५ इतके कंत्राटी कामगार विविध कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. कोव्हिड कालावधीत कंपनीची सेवा बजावताना माहे- जून २०२१ अखेर महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये अनुक्रमे ३८ व २१ कंत्राटी कामगारांचा मृत्यु झालेला आहे. महानिर्मिती कंपनीमध्ये कंपनीची सेवा बजावत असताना कोव्हिड प्रादुर्भावाच्या कालावधीत ६६ कंत्राटी कामगारांचा मृत्यु झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५)
मा. मंत्री (ऊर्जा) यांच्या स्तरावर दि. २१.०४.२०२२ रोजी महाराष्ट्र वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंता संघर्ष समिती व महाराष्ट्र राज्य वीज कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती यांच्या समवेत झालेल्या बैठकीत संघटनेने तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगाराला कंत्राटदार विरहीत ६० वर्षापर्यंत नोकरीचे संरक्षण मिळण्याबाबत मागणी केली होती. सदर बैठकीत तत्कालीन मा. मंत्री (ऊर्जा) यांनी दिलेल्या निर्देशानुसार कंत्राटी कामगारांना ६० वर्षापर्यंत कंत्राटदार विरहीत शाश्वत रोजगार संरक्षण तसेच नोकरी सुरक्षा देण्याबाबत तिन्ही कंपन्यांचे संचालक (मासं) इतर राज्यांतील सदर प्रश्नांच्या संदर्भातील माहितीचा अभ्यास करून परिक्षण करतील असे निर्देश दिले होते. त्यानुसार सदर बाबतीत महावितरण कंपनीकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

---

## पुणे शहरातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तयार केलेल्या सुधारीत नियमावलीबाबत

**(३२) ५२६६६ (२९-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ४८६ आणि पिंपरी-चिंचवड शहरातील ७१ झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तयार केलेली सुधारीत नियमावली राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली होती, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने अद्याप या नियमावलीला मान्यता दिली नसल्याने झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची सुधारीत नियमावली मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नविन नियमावली मंजूर नसली तरी यापूर्वीच्या दिनांक ११.०९.२०१४ रोजीच्या मंजूर नियमावलीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे क्षेत्रातील पुनर्वसन योजनांचे कामकाज सुरु आहे. दिनांक २३.०९.२०२१ रोजी प्रारुप नियमावलीस शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या जनतेच्या सूचना व हरकतींच्या अनुषंगाने शासनास दिनांक ०४.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या नविन नियमावलीस मान्यता देण्याची बाब अंतिम टप्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निलंगा येथील पोलीस वसाहत बांधकामाबाबत

**(३३) ५२८४९ (२३-०१-२०२३). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निलंगा येथील पोलीस निवासस्थानाच्या बांधकामाचा प्रस्ताव आपल्या विभागाकडे सादर झाल्याचे तसेच निलंगा मतदार संघात असलेल्या देवणी पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ३५ वर्षापूर्वी वसाहत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बांधण्यात आलेल्या वसाहतीची आता दुरवस्था झालेली असून ज्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंब सदस्यांची संख्या अधिक आहे त्यांना निवासस्थाने अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांना योग्य निवासस्थाने मिळण्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, देवणी येथे नवीन पोलीस वसाहत बांधण्यास मंजूरी देवून आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय.
त्यानुसार राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून प्राधान्यक्रमाची यादी मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आली होती.त्यानुसार शासन पत्र दि.०७.०२.२०२३ अन्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. यामध्ये पोलीस ठाणे निलंगा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता ७० निवासस्थान व पोलीस ठाणे देवणी येथे ४० निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे. निधीउपलब्धतेनंतर पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) येथील आदिवासी विभागात निवासी वसतिगृह बांधण्याबाबत

**(३४) ५२९४६ (१८-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथील आदिवासी विभागात गत ४० वर्षात एकही निवासी वसतिगृह नाही किंवा वसतिगृहाची क्षमता वाढविण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलासारी येथील वसतिगृहात विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे तेथील मुलींच्या दोन वसतिगृहातील विद्यार्थीनींना एकाच शासकीय निवासी वसतिगृहात राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,अनेक ठिकाणच्या मुला-मुलींच्या निवासी शासकीय वसतिगृहता गृहपाल नसून आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार डाहाणू आदिवासी विभागात नवीन निवासी वसतिगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०४-२०२३) :** (१) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू अंतर्गत १७ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून त्यापैकी ०९ मुलांचे व ०८ मुलींचे वसतीगृहे आहेत. एकूण १७ वसतिगृहांपैकी पालघर येथे प्रत्येकी ०१ मुलांचे व मुलींचे वसतीगृह, तलासरी येथे ०२ मुलांचे व ०१ मुलींचे असे एकूण ०५ वसतिगृहे ही शासकीय इमारतीत कार्यरत असून उर्वरीत १२ वसतिगृहे ही भाडयाच्या इमारतीत आहेत.
(२) हे अशंत: खरे आहे.

आदिवासी मुलींचे शासकीय तलासरी (नविन) या वसतिगृहास नविन भाडयाची इमारत उपलब्ध न झाल्याने सदर वसतिगृहात प्रवेशित मुलींची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरती राहण्याची व्यवस्था ही आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, तलासरी (जुने) येथे करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) आदिवासी मुलींचे वसतिगृह, तलासरी (नवीन) या वसतिगृहास वन विभागाकडून जागा प्राप्त झाली असून इमारत बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग यांचे स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कटंगी मध्यम प्रकल्प (जि.गोंदिया) येथील पिंडकेपार गावातील नागरिकांच्या घरांचे होत असलेले नुकसान**

**(३५) ५३०३७ (२२-०१-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील गोरेगाव येथील कटंगी मध्यम प्रकल्पामुळे पिंडकेपार गावातील घरांना ओल आल्याने अनेक घरे कोसळत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंडकेपार गावाचे पुर्नवसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०२३) :**(१) हे खरे नाही, गोंदिया जिल्ह्यातील कटंगी प्रकल्पात सन २००१ पासून पाणीसाठा करण्यात येत आहे. पिंडकेपार गाव कटंगी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पूर्ण संचय पातळी ( FTL) पासून १ कि.मी. अंतरावर असल्याने या गावातील घरे धरणाच्या पाण्यामुळे ओल येऊन कोसळले नाही. तथापि, माहे ऑगस्ट २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे ६ घरे व ८ गोठे अंशत: तसेच माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये २ गोठयांचे अशंत: नुकसान झाले आहे. सदर नुकसानधारकांना मदत वाटप करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु आहे.
(२) प्रश्न उदभवत नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर येथे १३२ के.व्ही. स्टेशन मंजूर करुन कार्यान्वित करण्याबाबत**

**(३६) ५३०५४ (१९-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदुरबार) येथील एम.आय.डी.सी. मधील औद्योगिक कारखाने, विदयुत पंपासाठीचा विजेचा वापर व घरगुती विजेचा वापर यासाठी विदयुत दाब जास्त असल्यामुळे वारंवार विज खंडीत होणे तसेच नवापूर परिसरात कमी दाबाचा विज पुरवठा होणे यामुळे विज ग्राहकांत असंतोषाची भावना निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवापूर परिसरात विसरवाडी येथे १३२ के.व्ही. सेंटर मधून विजपुरवठा होत असून या १३२ के.व्ही. सेंटरवर अगोदरच विदयुत पुरवठ्याचा भार जास्त असल्यामुळे नवापूर परिसरात कमी दाबाचा अनियमीत विदयुत पुरवठा तसेच वारंवार विज खंडीत होण्याचे प्रकार वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन नवापूर परिसरासाठी नवापूर येथे १३२ के. व्ही. सेटर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. महापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. विसरवाडी उपकेंद्रातून महावितरण कंपनीच्या ३३ के.व्ही. उपकेंद्रांना योग्य दाबाने व अखंडीत वीज पुरवठा होत आहे. तसेच, १३२ के.व्ही. विसरवाडी उपकेंद्रात पुरेशी क्षमता उपलब्ध आहे.
(३) नवापूर येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडुन महापारेषण कंपनीस प्राप्त झाला आहे. प्रणाली अभ्यासाद्वारे सुसाध्यता तपासून पुढील कार्यवाही नियमानुसार करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वाढीव वीजपुरवठा आकाराबाबत पुनर्विचार करून वीज दरवाढीमध्ये नियंत्रण आणण्याबाबत**

**(३७) ५३१३५ (१९-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यापूर्वी सरासरी वीजपुरवठा आकार रु. ६.७३ रुपये प्रति युनिट होता, सन २०२० -२१ मध्ये हा आकार रु. ७.२४ प्रति युनिट म्हणजे ७.६ टक्के वाढीव झाला व सन २०२४ - २५ मध्ये हा आकार रु. ८.१० प्रति युनिट म्हणजे एकूण २०.४% इतका वाढीव करणे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विज देयक सर्वसामान्य व गोरगरीब जनतेला देणे अत्यंत अडचणीचे असल्याने याबाबत शासन पुनर्विचार करून वीज दरवाढीमध्ये नियंत्रण आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि.३०.०६.२०२० रोजी सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ पर्यंतच्या कालावधीसाठी बहुवर्षीय वीजदर आदेश प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार महावितरणच्या विविध ग्राहक वर्गवारीकरीता वीज पुरवठा करण्यासाठी दि. ०१ एप्रिल २०२० पासून सुधारीत वीजदर लागू करण्यात आले आहेत. सदर आदेशावरील मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रसिध्दी पत्रकानुसार सन २०१९-२० साठी सरासरी वीजपुरवठा आकार रु. ७.९० प्रती युनिट (इंधन समायोजन आकारासहीत) यांच्या तुलनेत सन २०२०-२१ साठी मंजूर केलेल्या सरासरी वीज पुरवठा आकार रु.७.३५ युनिट एवढा विचार केल्यास वीजदरात ७% घट करण्यात आली आहे व नियंत्रण कालावधीच्या उर्वरीत कालावधीसाठी वीजदर समान पातळीवर ठेवण्यात आले आहेत.
महावितरण कंपनीतर्फे सादर केलेल्या मध्यावधी आढावा याचिकेत नमूद केलेली महसूली तूट ही ६ वर्षांपोटी आलेली असून त्यांची वसूली महावितरणने सन २०२३-२४ व सन २०२४-२५ साठी सरासरी दरवाढ वर्षानिहाय अनुक्रमे केवळ १४% व ११% प्रस्तावित केलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलिस उपविभागीय कार्यालयांतर्गत पोफाळी ( ता.उमरखेड, जि. यवतमाळ )**
**येथे पोलिस स्टेशनसाठी नविन इमारत बांधण्याबाबत**

**(३८) ५३२१६ (२४-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलिस उपविभागीय कार्यालयांतर्गत पोफाळी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) पोलिस स्टेशनला नविन इमारत बांधण्यासाठीचा कळमुला जागेचा प्रस्ताव शासनाकडे गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन पोलीस स्टेशनला जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०२३) :** (१) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक २९.०९.२०१८ रोजी पोलीस स्टेशन पोफाळीचे नवीन प्रशासकीय इमारत तसेच पोलीस अधिकारी व अमंलदार यांचेकरिता निवासस्थान बाधणेकामी मौजा कळंमुला येथे जमीन मंजूर असून सदर जागेचा फेरफार, ७/१२ पत्रक व ताबा पावती शासना तर्फे पोलीस अधीक्षक, यवतमाळ मार्फत ठाणेदार, पोलीस स्टेशन, पोफाळीचे नावाने झालेली आहे.
(२) मौजा कळंमुला येथील गट क्र.६८ क्षेत्र १५.३७ हेक्टर आर पैकी १.२१ हेक्टर आर ई वर्ग जमीन ही शासनाचे नावे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार जवळील वैतरणा व वाढीव येथील जेट्टीला दोन्ही टोकावर टप्पे व पायऱ्या**
**बांधण्यात आल्या नसल्याबाबत**

**(३९) ५३३२७ (२४-०१-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार जवळील वैतरणा व वाढीव येथील दोन्ही ठिकाणी मेरीटाईम बोर्ड यांच्यातर्फे उभारण्यात आलेल्या जेट्टीला शेवटच्या दोन्ही टोकावर टप्पे व पायऱ्या तयार करण्यात आल्या नसल्याने वैतरणा व वाढीव गावातील नागरीकांना आपल्या खाजगी बोटीतून प्रवासा दरम्यान पाण्याच्या खोलीचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैतरणा येथील एकाच कुटुंबातील दोन मुलींचा जेट्टीवर तोल जाऊन मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दोन्ही जेट्टीची शासनाने पाहणीकरुन चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तेथील नागरीकांच्या सोयी सुविधेसाठी तथा करण्यात आलेल्या जेट्टीवर भविष्यात कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून वैतरणा व वाढीत या दोन्ही जेट्टीवर पायऱ्या बांधण्यात यावा अशी मागणी डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेतर्फे मेरीटाईम बोर्ड, पालघर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू दोन्ही जेट्टीवर पायऱ्या बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०९-०४-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) मांडवी पोलीस ठाणे यांचे मृ.रजि २०/२०२२ कलम १७४ सी आर पी सी दिनांक १५.१०.२०२२ च्या नोंदी प्रमाणे वैतरणा खाडी जेट्टी पॉईंट जवळ फिरण्यास गेले असता यातील मयत हे खाडीच्या पाण्यात मोबाईल फोनवर सेल्फी काढत असताना पाय घसरल्याने पाण्यात पडून पोहता येत नसल्याने मृत झाल्या आहेत. म्हणुन पाण्यात पडुन बुडुन मयत झाले असावे असे पोलीस उपनिरिक्षक मांडवी यांनी कळविले आहे.
(३) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने पाहणी केली आहे.

(४) होय.
वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेकडून दि.२८.१०.२०२२ च्या पत्रान्वये मागणी करण्यात आली आहे.
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत प्रवासी जलवाहतुकीकरिता उतरती जेट्टी (Slopping jetty) व पाय-यांची जेट्टी अशा प्रकारच्या जेट्ट्यांचे बांधकाम करण्यात येते.वैतरणा व वाढीव बेट, जि.पालघर या दोन्ही ठिकाणी वाढीव बेटावर राहणा-या लोकांच्या प्रवासी वाहतुकी बरोबरच त्यांच्या सोयीच्या दृष्टीने भविष्यात मोटार सायकल अशी वाहने तसेच सामानाची ने-आण करण्याच्या दृष्टीने स्लोपिंग जेट्टीचे बांधकाम करण्यात आले आहे.
(५) स्लोपिंग रॅम्प दिला असल्याने पाय-या बांधण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## दक्षिण मुंबई ते नवी मुंबई अशी समुद्रमार्गे सुरु केलेल्या वॉटर टॅक्सीला प्रवाशांचा अत्यंत कमी प्रतिसाद मिळाल्याबाबत

**(४०) ५३४८० (२४-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबई ते नवी मुंबई अशी समुद्रमार्गे सुरु केलेल्या वॉटर टॅक्सीला प्रवाशांचा अत्यंत कमी प्रतिसाद मिळाल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वॉटर टॅक्सीचे एका मार्गाचे भाडे हे तब्बल ८०० ते १५०० रुपये आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांचा या वॉटर टॅक्सीला प्रतिसाद मिळण्याकरिता शासनाने काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, प्रवाशांना परवडणारे भाडे आकारून, फेऱ्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (०४-०४-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
बेलापूर ते एलिफंटा/मांडवा या जलमार्गावर वॉटर टॅक्सीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद आहे. दक्षिण मुंबई ते नवी मुंबई या जलमार्गावर अल्प प्रतिसाद आहे.
(२) नाही.
दक्षिण मुंबई ते नवी मुंबई सेवेसाठी विविध जलयान धारकांना रु. ४५०/- ते ११००/- इतक्या भाड्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४)
अ) वॉटर टॅक्सीला प्रवाशांचा प्रतिसाद मिळण्यासाठी शासन अधिसूचना क्रमांक MIS-०३२२/C.R.४३/Port-१ dt. २४.०६.२०२२ नुसार ०१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत नव्याने सुरु झालेल्या जलमार्गावरील प्रवासी कर माफ करण्यात आला आहे.
ब) दि. ०७.०२.२०२३ पासून बेलापूर ते गेटवे ऑफ इंडिया अशी अत्याधुनिक सुसज्ज २०० प्रवासी क्षमता असलेली कॅटमरन बोट सेवा सुरु केली आहे.
क) सदर सेवेसाठी सामान्य नागरिकांसाठी २५०/- बिजनेस क्लाससाठी रु. ३५०/- इतके तिकीट दर आकारण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत**

**(४१) ५३७५२ (२२-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकलपाचा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी नागपूर येथील जलविकास प्राधिकरणाने दिल्ली येथील राष्ट्रीय जलविकास अभिकरणाच्या महानिर्देशांकडे हा प्रकल्प अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी ८६ हजार ४४२ कोटी खर्च अपेक्षित असून १७७२ दशलक्ष घनमीटर जलसाठा उपलब्ध होईल व यातून येथील ५ जिल्हयातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर प्रकल्पाला मंजूरात व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०२३) :** (१) नाही.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास दि. ०६.११.२०१८ रोजी राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाने सादर केला आहे.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. ८८५७५ कोटी इतकी येत आहे. प्रकल्पाचा अपेक्षीत पाणी वापर १७७२ दलघमी असून एकूण ६ जिल्हयातील ३,७१,२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

(४) सदर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रदान करणेच्या अनुषंगाने प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे क्षेत्रीय स्तरावरून तांत्रिक छाननीसाठी सादर केला आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांची छाननी पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याची आर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे. सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर इतर वैधानिक मान्यता, निधी मागणी इत्यादी बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहर ग्रामीण व नांदुरा शहर पोलीस स्टेशनची इमारतीचे नवीन बांधकाम करण्याबाबत

**(४२) ५४३१९ (२४-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहर ग्रामीण व नांदुरा शहर पोलीस स्टेशनची इमारतीचे बांधकाम हे फार वर्षांपूर्वीचे असल्यामुळे सदर इमारत ही जीर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर जीर्ण इमारतीची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असल्यामुळे तिथे कार्यरत कर्मचाऱ्यांचे जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास सदर इमारतीचे बांधकाम मंजूर करण्याबाबत लेखी निवेदन शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०२३) :** (१), (२), (३), व (४) मलकापूर शहर पोलीस स्टेशनची इमारत जीर्ण झालेली आहे.

मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन इमारतीचे बांधकाम २००४-०५ मध्ये करण्यात आले असल्याने, सदर इमारत सुस्थितीत आहे.

नांदूरा शहर पोलीस स्टेशनची इमारतीस १०० वर्ष पुर्ण झालेली आहे. सदर इमारतीची दुरुस्ती २०२२ रोजी करण्यात आली असुन, इमारत सुस्थितीत आहे. पोलीस महासंचालक यांचे पत्र दि.२०/०२/२०२३ अन्वये नांदुरा शहर पोलीस स्टेशन प्रस्ताव पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांचेकडून मागविण्यात आलेला आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामाची प्राधान्यक्रम यादीस दि.०७.०२.२०२३ अन्वये शासन मान्यता दिली आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये पोलीस अधीक्षक, बुलढाणा येथील पोलीस स्टेशन, मलकापूर शहर करिता नवीन प्रशासकीय बांधकामाचा समावेश आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून निधी उपलब्धतेनुसार सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चाळीसगाव येथील सिंचन समस्याबाबत

**(४३) ५४५८८ (२२-०१-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव मतदारसंघात जलसंपदा विभागांतर्गत येणाऱ्या सिंचन समस्यासंदर्भात विविध प्रलंबित व महत्वाच्या विषयांच्या अनुषंगाने, स्थानिक लोकप्रतिनिधीनी गेल्या अडीच वर्षात तत्कालीन जलसंपदा मंत्री महोदय यांच्याकडे लेखी व भेट घेऊन पाठपुरावा केला होता त्यात प्रामुख्याने १) गिरणा मोठ्या प्रकल्पातून मन्याड प्रकल्पात पाणी टाकणे (नदीजोड) प्रकल्प, २) गिरणा पांझण डावा व मन्याड उजवा कालवा यांची विशेष दुरुस्ती व कॉक्रीटीकरण होणे, ३) तापी एकात्मिक जल आराखड्यात मन्याड प्रकल्पाकरिता पाण्याची तरतूद होणे, ४) वरखेडे लोंढे प्रकल्प लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना बंदिस्त पाईपलाईन द्वारे शेतीला पाणीपुरवठा होणे, ५) वरखेडे लोंढे प्रकल्प बुडीत क्षेत्रात येणाऱ्या तामसवाडी गावाचे पुनर्वसन करणे आदी कामांचा समावेश होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या अडीच वर्षात तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्याकडुन सातत्याने या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात आले व या विविध कामांचा चाळीसगाव तालुक्यातील ६० ते ७० गावांच्या शेती, सिंचन व अर्थकारण यावर थेट परिणाम झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेली अडीच वर्ष कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झालेल्या या समस्या मार्गी लावण्यासाठी उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही चौकशी केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) १. गिरणा मोठ्या प्रकल्पातून मन्याड प्रकल्पात पाणी टाकणे (नदीजोड) प्रकल्पाबाबत क्षेत्रीय स्तरावर तपासणीची कार्यवाही प्रगतीत आहे.
१. पाचोरा भडगांव तालुक्यातील गिरणा प्रकल्पाच्या कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामांना खास बाब म्हणुन मंजुरी देऊन निधी मिळणेबाबत अंतर्गत जामदा उजवा व डाव्या कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामाचा रू. २.९७ कोटी रक्कमेचा प्रस्ताव महामंडळाचे पत्र दिनांक ३०/०८/२०२२ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला होता. यासंदर्भात शासनाचे सन २०२२-२३ मधील मंजुर निधी व दायित्व यांचा विचार करता या आर्थिक वर्षात तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडील विशेष दुरुस्ती / विस्तार व सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता देणे शक्य नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. सदरहू पांझण डावा कालवा व मन्याड उजवा कालवा यांचे अस्तरीकरण करणेबाबत अंदाजपत्रक तयार करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे व पुढील आर्थिक वर्षात विशेष दुरुस्ती प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.
२. मन्याड मध्यम प्रकल्पास एकात्मिक जल आराखडयामध्ये ३७.६६ दलघमी इतक्या पाणी वापराची तरतुद आहे.
३. वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये लाभ क्षेत्रातील सिंचन पारंपारिक कालव्याद्वारे प्रस्तावित होते. तथापि स्थानिक शेतकऱ्यांच्या व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेनुसार पारंपारिक कालवा प्रणाली (७५४२ हे.) ऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे (८२९० हे.) करणेस कार्यकारी संचालक यांनी त्यांचे दि. २३/०६/२०२२ चे पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या संकल्पनास मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी दि. २१/१२/२०२२ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केलेली आहे व त्यानुसारचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेच्या कार्यवाहीत आहे. पारंपारिक कालवा पद्धती ऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणाली करणे यामुळे सदरहू कामास विलंब झाला आहे.
४. स्थानिक गावक-यांच्या विरोधामुळे व त्यांची १००% गाव पुनर्वसनाची मागणी असल्याने तामसवाडी गावाचे पुनर्वसन करणेस विलंब झालेला आहे. तथापि सद्यस्थितीत मौजे तामसवाडी, ता. चाळीसगाव या गावाचे पुनर्वसनाचा भूसंपादन प्रस्ताव क्र. ०५/२०२२ मौजे पिलखोड मधील खाजगी जमिनीची संयुक्त मोजणी फी पत्र दि.१२/०७/२०२२ अन्वये उप अधीक्षक, भुमी अभिलेख, चाळीसगाव यांना अदा करण्यात आले. सदर जमीनी अंतिम झाल्यावर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

---

## मोर्शी, (जि.अमरावती) येथे आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय निर्मिती करण्याबाबत

**(४४) ५५०५९ (१८-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी जनतेसाठी शासनाच्या विविध विकास योजना कार्यान्वित करण्यासाठी धारणी,( जि. अमरावती) येथे आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत प्रकल्प अधिकारी कार्यालय कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोर्शी वरुड व आसपासच्या इतर तालुक्यातील आदिवासी जनतेला धारणी पी.ओ.कार्यालय सुमारे १९५ ते २०० किलोमीटर लांब पडत असल्याने मोर्शी, (जि.अमरावती) येथे नव्याने आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय निर्मितीची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोर्शी जि. अमरावती येथे सध्या कार्यरत सहाय्यक प्रकल्प अधिकारी कार्यालयात अपूर्ण अधिकारी/कर्मचारी वर्ग असल्याने तसेच प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून मंजुरात घ्यावी लागत असल्याने शासकीय कामकाजात प्रचंड विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोर्शी जि.अमरावती येथे नव्याने आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय निर्मितीबाबत अथवा कार्यरत सहाय्यक प्रकल्प अधिकारी कार्यालयात रिक्त पदे भरून त्यांना अधिकार प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांनी दि.१३.१०.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी प्रत्येक आठवड्यातील ३ दिवस (सोमवार, मंगळवार व बुधवार) मोर्शी येथे उपस्थित राहण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे आठवड्यातील ३ दिवस मोर्शी येथे उपस्थित राहुन आदिवासी बांधवांच्या अडीअडचणी दुर करतात तसेच वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या योजनांबाबत मार्गदर्शन करुन त्यांच्याकडून अर्ज प्राप्त करुन ते प्रकल्प कार्यालय, धारणी येथे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचोरा- भडगांव (जि.जळगांव) शहरातील पोलिस कर्मचा-यांना नविन निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) ५५०७४ (२४-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा- भडगांव (जि.जळगांव) शहरातील पोलिस कर्मचा-यांची व अधिका-यांची जुनी निवासस्थानांच्या जागी नविन निवासस्थाने व नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याकरिता मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२५.७.२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०२३) :** (१) व (२) राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून दि.०७.०२.२०२३ पत्रान्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये पाचोरा-भडगांव पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार यांचेकरिता ३८ निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि. बीड) येथील पोलीसांच्या घरांची झालेली दूरवस्था

**(४६) ५५१५९ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यात पोलीस वसाहतीतील पोलिसांसाठी असलेली घरे अत्यंत जुनी झाली असून राहण्यासाठी धोकादायक बनली असून सदर घरे पावसाळ्यात गळतात. त्यामुळे नवीन घरांचे बांधकाम होणे आवश्यक

असल्याने त्यासाठी मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे गृह मंत्री यांचेकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०२३) :** (१) व (२) पोलीस स्टेशन, अंबेजोगाई येथील पोलीस वसाहतीतील पोलीसासाठी असलेली घरे जूनी व जीर्ण झाली आहेत याबाबत लोकप्रतिनिधीची पत्रे शासनास सादर झाली आहेत.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून, दि.०७.०२.२०२३ अन्वये सदर प्राधान्यक्रम यादीस शासन मान्यता दिली आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये पोलीस स्टेशन, अंबेजोगाई शहर व ग्रामीण येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता ३०० निवासी बांधकामाचा समावेश आहे. पुढील कार्यवाही निधी उपलब्धतेप्रमाणे महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभाग कार्यालयाचे उपकार्यालय (ता.एरंडोल, जि. जळगांव )**
**ठिकाणी स्थापन करण्याबाबत**

**(४७) ५५५५५ (१८-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग कार्यालयाचे उपकार्यालय एरंडोल तालुक्याच्या (जि.जळगांव) ठिकाणी स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी आदिवासी विकास मंत्री, तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०४-०४-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना दि.२०.०९.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल अंतर्गत उपकार्यालय, एरंडोल, जि.जळगाव येथे सुरु करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील मंजूर १३२ के.व्ही.सबस्टेशन च्या कामा ला निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(४८) ५५५८९ (२३-०१-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथे यवतमाळ व धामणगाव येथून विद्युत पुरवठा होत असल्याने एखादया ठिकाणी तार तुटल्यास पुर्ण तालुक्याची वीज खंडीत होते त्यामुळे तालुक्यातील विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी खडकसावंगा ता.बाभुळगाव येथे १३२ के.व्ही नवीन सबस्टेशन मंजूर करण्यात आले असल्याचे दिनांक १२ नोव्हेबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर १३२ के.व्ही सब स्टेशन चे काम विद्युत नियामक मंडळ कडे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंजुर १३२ के.व्ही सबस्टेशनच्या कामा करिता निधी मंजुर करुन काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
बाभुळगांव (जि. यवतमाळ) येथे १३२ के.व्ही.उपकेंद्र उभारण्यास महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाने ठराव क्र.१३६/२७, दि.२९.०७.२०१९ अन्वये मंजूरी दिली होती. त्यानंतर उपकेंद्राचा प्रस्ताव मा. वीज नियामक आयोगाकडे तत्वत: मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.
(२) हे खरे आहे.
(३) सध्यस्थितीत उपकेंद्राच्या प्रस्तावाची वैधता (दोन वर्षे) संपुष्टात आली असल्याने महापारेषण कंपनीच्या धोरणास अनुसरुन प्रस्तावास संचालक मंडळाची पुर्नमान्यता घेण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. प्रस्तावास पुर्नमान्यता मिळाल्यावर परिपूर्ण प्रस्ताव मा. वीज नियामक आयोगाकडे तत्वत: मान्यतेसाठी पुनश्च पाठविण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण कंपनीमधील जाहिरात क्र.०५/२०१९ उपकेंद्र साहाय्यक या पदांची प्रतिक्षा यादीत SEBC आरक्षण अंतर्गत पात्र उमेदवारांची पदे वाढविण्याबाबत

**(४९) ५६४८१ (२०-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीमधील जाहिरात क्र.०५/२०१९ उपकेंद्र सहाय्यक या पदांची प्रतिक्षा यादी जाहिर होत असताना प्रतिक्षा यादीमध्ये असणाऱ्या SEBC आरक्षण अंतर्गत पात्र झालेल्या उमेदवारांना निवड यादीप्रमाणे अधिसंख्या पदे निर्माण करण्याची मागणी लोकप्रतिनीधी यांनीअध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महावितरण मुंबई यांचेकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदणाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निवड यादीतील समांतर आरक्षणानुसार रिक्त पदांचा विचार करुन प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३१.०१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार अधिसंख्य पदे निर्माण करुन नियुक्त्यांची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण कंपनीने घेतलेल्या कनिष्ठ अभियंता पदाच्या उमेदवारांमधून EWS प्रर्वगामधुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती करण्याबाबत

**(५०) ५६४८२ (२०-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनी अंतर्गत घेण्यात आलेल्या जाहिरात क्र.०६/२०१९ कनिष्ठ अभियंता मधील मराठा समाजाच्या EWS प्रर्वगामधुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त करण्याची मागणी लोकप्रतिनीधी यांनी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महावितरण प्रकाशगड मुंबई यांचेकडे दि.२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने उमेदवारांना नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीने जाहिरात क्र. ०६/२०१९ अन्वये एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यु.एस. प्रवर्गातील उमेदवारांकरीता पदविका अभियंता प्रशिक्षणार्थी (वितरण) - २९ पदे व पदविका अभियंता प्रशिक्षणार्थी (स्थापत्य) -०१ पद अशी जाहीरात प्रसिद्ध केली होती. त्यानुसार पदविका अभियंता प्रशिक्षणार्थी (वितरण) मधील एकूण २७ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून २ उमेदवार कागदपत्र पडताळणीसाठी हजर नसल्याने त्यांची नियुक्ती होऊ शकली नाही. तसेच पदविका अभियंता प्रशिक्षणार्थी (स्थापत्य) मधील ०१ उमेदवारांना महावितरण कंपनीतर्फे नियुक्ती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव – १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.